# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**तलासरी (जि.ठाणे) येथील आश्रमशाळेच्या वसतिगृहाची दुरावस्था झाल्याबाबत**

**(१) ७०२ (२२-१२-२०१४). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.ठाणे) येथील आश्रमशाळा वसतिगृहाची दुरावस्था झाली असून बांधकामे अपूर्ण असल्याचे माहे जून, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनामार्फत उक्त प्रकरणी पाहणी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदर पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०१-२०१८) :** (१), (२) व (३) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू, जि.पालघर अंतर्गत एकूण १४ आश्रमशाळांच्या ठिकाणी वसतिगृह इमारत बांधकामासाठी रु.४०.०० लक्षच्या मर्यादेत मंजूरी देण्यात आली आहे. तलासरी तालुक्यामध्ये उधवा, वरवाडा, सवणे, डोंगारी व गिरगांव येथील मंजूर असलेल्या वसतिगृहांचे बांधकाम ८०% पूर्ण झालेले असून उर्वरित २०% कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरंगळा (ता.औसा, जि.लातूर) येथे नवीन रोहित्राची कामे करणेबाबत**

**(२) ४८४६० (२०-०४-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरंगळा (ता.औसा, जि.लातूर) येथे शेतकऱ्यांच्या विद्युत पंपास कमी दाबाने विद्युत पुरवठा होत असल्यामुळे सदर गावातील तीन ठिकाणी नवीन रोहीत्राचे काम करण्याबाबत लातूर ग्रामीण स्थानिक लोकप्रतीनिधिनी व कार्यकारी अभियंता, म.रा.वि.कंपनी विभाग निलंगा यांच्याकडे दिनांक ०३ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रोहित्राची कामे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) होय, महावितरण कंपनीने चौकशी केली आहे.

(३) कोरंगळा ता. औसा, जि. लातूर येथील शेतकऱ्यांच्या विद्युत पंपांना योग्य दाबाचा वीज पुरवठा होण्याच्या दृष्टीने कोरंगळा येथे तीन नवीन ठिकाणी रोहित्रे बसविण्याचे महावितरण कंपनीमार्फत प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आश्रामशाळांमध्ये विद्यार्थ्यांना रेनकोट, स्वेटर इ.सोयी सुविधा न मिळाल्याबाबत

**(३) ५१८२९ (२९-०४-२०१६). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना क्रीडांगणे, रेनकोट, स्वेटर इ. कोणत्याही सोयी सुविधा पुरवल्या जात नसल्याचे मत राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती आयोगाचे अध्यक्ष यांनी व्यक्त केल्याचे खरे आहे काय,

(२) असल्यास, आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना क्रीडांगणे, रेनकोट, स्वेटर इ. सोयी सुविधा पुरविण्यासाठी शासन काय कार्यवाही करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०१-२०१८) :**(१) व (२) शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना रेनकोट, स्वेटर इत्यादी वैयक्तिक वापराच्या वस्तूंसाठी थेट निधी विद्यार्थ्यांचे खात्यावर जमा करण्यात आला आहे. तसेच क्रिडांगण विकास व खेळ साहितय उपलब्ध करुन देण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय आश्रमशाळेतील मृत्युमुखी पडलेल्या बालकांच्या कुटुंबियांना अद्याप नुकसान भरपाई दिली नसल्याबाबत

**(४) ५५०६२ (१२-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय आश्रमशाळेतील पाच वर्षात मृत्युमुखी पडलेल्या ५२८ पैकी ११७ बालकांच्या कुटुंबियांना अद्याप शासनाने ७५ हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात आली नसून चार हजार कोटी रुपयांची आदिवासी खात्यासाठी तरतूद केलेली असतांनाही शासनातर्फे गरीब आदिवासी पालकांसाठी देय असलेले ८७ लाख १५ हजार रुपये गेले वर्षभरापासून अद्याप देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मृत बालकांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई आणि आदिवासी पालकांची थकित देय रक्कम न देण्याची व त्यास लागत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, प्रलंबित नुकसान भरपाई रक्कम त्वरीत देण्याच्या दृष्टीने अद्याप शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०१-२०१८) :** (१) व (२) राज्यातील शासकीय आश्रमशाळेतील सन २०११-१२ ते सन २०१५-१६ या कालावधीत विविध कारणांने मृत्यू पडलेल्या एकूण ४३६ विद्यार्थ्यांच्या पालकांना रु.७५,०००/- प्रमाणे सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले आहे. राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांचे मृत्यू रोखण्याबाबत डॉ.साळुंखे समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने अंमलबजावणी करण्यांत येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांच्या दुरावस्थेबाबत

**(५) ५७४०० (१२-०८-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांची प्रचंड दुरावस्था झाली असून टेंभे, माळ, कोठारे आश्रमशाळा चक्क पडक्या घरांत, गोठयात भरविल्या जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक जनतेनी तसेच लोकप्रतिनिधींनी शासनाकडे याबाबत वर्षभर निवेदने देऊनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच आश्रमशाळांना जागा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०१-२०१८) :** (१) व (२) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील शासकिय आश्रमशाळा, आंबिवली, कोठारे व विहिगाव माळ या तिन्ही आश्रमशाळांमध्ये सन २०१५-१६ या वर्षात जिल्हास्तर योजनेतून अनुक्रमे रु.३६.४२ लक्ष व रु.५९.२० लक्ष एवढ्या रकमेचे तात्पुरत्या स्वरुपाचे शेडस बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार सदर ठिकाणी अनुक्रमे ३ शेड्स (६ वर्गखोल्या), ५ शेड्स (१० वर्गखोल्या) बांधकाम करण्यात आले आहे.

तसेच शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील शासकीय आश्रमशाळा, आंबिवली, विहिगांव माळ व कोठारे या ठिकाणी मुलींसाठी स्वतंत्र (शेडटाईप) इमारत बांधकाम करण्यासाठी जिल्हास्तर योजनेतून सन २०१६-१७ या वर्षात प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदरचा निधी रु.६६.६४ लक्ष आदिवासी बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आला असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) ठाणे प्रकल्पातील २३ शासकीय आश्रमशाळांना जमिनी प्राप्त आहेत. त्यापैकी १४ आश्रमशाळांच्या जमिनी विभागाच्या नावावर आहेत व ९ आश्रमशाळांच्या जमिनी सद्या विभागाच्या नावे झालेल्या नाहीत. सदर जमिनी विभागाच्या नावे करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## केंद्र सरकारकडून उत्पादन शुल्कात वाढ केल्यानंतर महवितरणाकडून ४ टक्के दरवाढीच्या प्रस्ताव महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे सादर केल्याबाबत

**(६) ६११०२ (१६-०८-२०१६). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारकडून उत्पादन शुल्कात वाढ केल्यानंतर महवितरणाकडून ४ टक्के दरवाढीच्या प्रस्ताव महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे (एमईआरसी) सादर करण्यात आला आहे काय,
(२) असल्यास, एमईआरसी ने दरवाढीला मंजूरी देताच नवीन वीजदर लागू होणार असल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सर्वसामान्य जनतेचा विचार करता घरगुती वीज वापराला या दरवाढीतून वगळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०१-२०१८) :** (१) महावितरण कंपनीने मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या बहुवर्षीय वीजदर विनियमाप्रमाणे बहुवर्षीय वीजदर याचिका सादर केली होती. सदर पस्तावाचा केंद्रीय उत्पादन शुल्क वाढीशी कुठलाही थेट संबंध नाही.
(२) व (३) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दि. ३/११/२०१६ च्या वीजदर आदेशान्वये सन २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीकरीता महावितरण कंपनीच्या ग्राहकांकरिता वीजदर जारी केले आहेत. सदर कालावधीतील सरासरी वीजदर वाढ ही १.२% ते २% इतकी आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात अनुदानीत वसतीगृहांच्या थकीत अनुदान व कर्मचाऱ्यांच्या मानधनाबाबत**

**(७) ६२९८४ (२०-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यात सुमारे २३८८ अनुदानीत वसतीगृहे आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१५-२०१६ मध्ये या वसतीगृहांना ३५ कोटी रुपयांचा निधी कमी पडला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे कर्मचाऱ्यांचे मानधन आणि विद्यार्थ्यांच्या सुविधा यांचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, त्याअनुषंगाने चालु आर्थिक वर्षात काय तरतूद करण्यात आली आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.
(४) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात अनुदानित वसतिगृहांना प्राप्त झालेली तरतूद दि.३१/०३/२०१६ रोजी रात्री १०.०० वाजेपूर्वी वितरीत करणे गरजेचे होते. सदरहू जबाबदारी संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण यांची होती. तथापि, अपुरा कालावधी व तांत्रिक अडचणींमुळे सदरहू रक्कम पूर्णपणे खर्च झाली नाही व त्यातील सुमारे रु.२०.३२ कोटी रक्कम व्यपगत झाल्याने वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना मानधन व विद्यार्थ्यांचे परिपोषण अनुदान अदा करण्यास अडचणी निर्माण झाल्या.

सदर योजनेंतर्गत सन २०१६-१७ या वर्षात रु.१३९.७६ कोटी एवढी तरतूद उपलब्ध झाली असून त्यातून प्रलंबित अनुदान अदा करण्यात येत आहे.

---

**यावल (जि.जळगाव) तालुक्यातील आदिवासी विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत**

**(८) ७०९८५ (२७-०१-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल (जि.जळगाव) तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांची सुवर्ण महोत्सव योजनेंतर्गत दिली जाणारी शिष्यवृत्ती अद्यापही बँकेच्या खात्यांमध्ये जमा न झाल्याचे दिसून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे आदिवासी विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याचे दिसून आले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना लवकरात लवकर मिळणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-०१-२०१८) :** (१) शिष्यवृत्ती मंजूर करतांना वेबसाईटला तांत्रिक अडचणी येत असल्याने काही विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम अदा करता आले नाही, हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) उर्वरीत विद्यार्थ्यांच्या यादया शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडे पाठविण्यात आले असून त्याप्रमाणे संबंधीत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्याची कार्यवाही सूरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## यावल (जि.जळगाव) येथील आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत असलेल्या वसतीगृहामधील मुलांना जेवण न मिळाल्याबाबत

**(९) ७०९८७ (२७-०१-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यावल (जि.जळगाव) येथील आदिवासी मुलांच्या वसतिगृहामध्ये जेवण न मिळाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसतिगृहातील मुलांनी जेवण न मिळाल्यामुळे रात्री ९ वाजता प्रकल्प कार्यालयामध्ये ठिय्या मांडला होता, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वसतिगृहातील मुलांना दररोज योग्य प्रकारचे जेवण मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-०१-२०१८) :** (१) यावल, जि.जळगाव येथे आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृहातील भोजन पुरवठाधारक व विद्यार्थी यांच्या मध्ये जेवणासंबंधी वाद झाल्यामुळे या वसतीगृहामधील विद्यार्थ्यांनी जेवण घेण्यास नकार दिला होता.
(२) हे खरे आहे.

(३) वसतीगृहात प्रवेशीत विद्यार्थ्यांना प्रचलीत शासन नियमाप्रमाणे भोजन पुरवठा न केल्यास शासनाच्या काळ्या यादीत नाव टाकण्यात येईल याबाबत संबंधीत भोजन पुरवठादारकास सक्त सूचना देण्यात आले. विद्यार्थी व भोजन पुरवठादार यांच्यामध्ये प्रकल्पस्तरावर सामंजस्यपणे चर्चा घडवून आणले. तद्नंतर विद्यार्थ्यांची जेवणाविषयी कोणतीही तक्रार प्राप्त झाली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अनुसूचित जाती- जमातीसाठीच्या विकास निधीसाठी केंद्र शासनाकडून सन २०१४-१५ मध्ये राज्य शासनास निधी मिळणेबाबत**

**(१०) ७१४९३ (२७-०१-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुसूचित जाती-जमातीसाठीच्या विकास निधीसाठी केंद्र शासनाकडून सन २०१४-१५ मध्ये राज्य शासनास एकूण किती निधी प्राप्त झाला,
(२) त्यापैकी प्रत्यक्षात किती निधीचा विनीयोग राज्य शासनाकडून करण्यात आला व तो कोणत्या जिल्ह्यात, त्याचे जिल्ह्यानिहाय प्रमाण काय,
(३) तसेच निधी प्रलंबित असल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (११-०१-२०१८) :** (१) अनुसूचित जातीसाठीच्या विकास निधीसाठी केंद्र शासनाकडून सन २०१४-१५ मध्ये राज्य शासनास एकूण रु.८७,२२४.६४ लक्ष इतका निधी प्राप्त झाला.
(२) सदरील निधीचा राज्य शासनाकडून पूर्णपणे विनियोग करण्यात आला असून त्याचे जिल्हानिहाय विनियोगाचे प्रमाण यासोबत जोडले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील विज वितरण कंपनीच्या रोहित्रांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(११) ७२९३९ (२७-०१-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील विज वितरण कंपनीचा रोहित्र (डीपी) जळणे, ओव्हरलोडमुळे लाईन ट्रीप होणे, भारनियमन यामुळे उत्पादनात घट येण्याची शक्यता असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वारुळी शिवारातील रोहित्र जळाले असून त्यामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती येथील शेतीपंपाना सुरळीत वीजपुरवठा व्हावा तसेच रोहित्रांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०१-२०१८) :** (१) अतिभारामुळे रोहित्र नादुरुस्त होणे किंवा वाहिनी बंद पडणे अशावेळी महावितरणकडून त्वरीत रोहित्र बदलण्यात येतो. तसेच वीज वाहिनीवरील दोष दूर करुन त्यावरील वीज पुरवठा सुरळीत केला जातो.
(२) खेडे वारुळी शिवारात एकूण ६ वितरण रोहित्रे स्थापित असून त्यापैकी एक रोहित्र (धरण डी.पी.) अतिभारामुळे दिनांक २५.०८.२०१६ रोजी नादुरुस्त झाले व दिनांक २६.०८.२०१६ रोजी बदलण्यात आले. तसेच वरील रोहित्र दिनांक २७.०८.२०१६ रोजी पुन्हा नादुरुस्त झाल्याने दिनांक २९.०८.२०१६ रोजी तातडीने बदलण्यात आले.

वारुळी शिवारातील धरण (डी.पी.) रोहित्र एकापेक्षा जास्त वेळी नादुरुस्त झाल्यामुळे त्या रोहित्रावरील भार कमी करण्यासाठी व त्या रोहित्रावरील कृषीपंप ग्राहकांना सुरळीत वीज पुरवठा करण्याकरिता एक अतिरिक्त रोहित्र कार्यान्वित करण्यात आले आहे.
(३) मोताळा तालुक्यात शेतकऱ्यांना योग्य दर्जाचा विद्युत पुरवठा मिळण्याकरिता वाघजळ येथे नवीन ३३/११ केव्ही उपकेंद्र पायाभूत आराखडा-२ योजने अंतर्गत दि. २१.१२.२०१६ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे. तसेच पोफळी उपकेंद्र येथे ५ एमव्हीए क्षमतेचे अतिरिक्त रोहित्र पायाभूत आराखडा-२ योजने अंतर्गत प्रस्तावित आहे. सदोष रोहित्रे दुरुस्त करण्यास नोंदणीकृत संस्थांना ई-निविदेद्वारे कार्यादेश देऊन उपयुक्त रोहीत्रांचा साठा उपलब्ध केलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक महावितरण कंपनीमधील व्दारका उपविभाग कार्यालयाचे विभाजन करुन पाथर्डीफाटा येथे नविन उपविभाग कार्यालय सुरु करणेबाबत

**(१२) ७४५७२ (२८-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महावितरण कंपनीमधील व्दारका उपविभाग कार्यालयाचे विभाजन करुन पाथर्डीफाटा येथे नवीन उपविभाग कार्यालय सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महावितरण कंपनीने त्यांच्या दिनांक ०४.१०.२०१० च्या आदेशान्वये प्रस्तृत केलेल्या मानकांनुसार नवीन उपविभाग निर्मितीसाठी किमान ५०,००० ग्राहक असणे आवश्यक आहे. पाथर्डी फाटा येथे निश्चित केलेल्या मानकांपेक्षा ५४९२ वीजग्राहकांची संख्या कमी आहे. सबब, नवीन पाथर्डी फाटा उपविभाग कार्यालय निर्माण करणे सद्यस्थितीत शक्य नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वीज ग्राहकांचे भारनियम रद्द करण्याच्या निर्णयाबाबत**

**(१३) ७६९३७ (२८-०४-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.राहूल पाटील (परभणी), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व ग्राहक श्रेणीतील वीज ग्राहकांचे भारनियम रद्द करण्याचा निर्णय शासनाने माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जादा वीज गळती असणाऱ्या जी-१, जी-२ आणि जी-३ या ग्राहक श्रेणीतील वीज ग्राहकांचे भार नियमन कायमस्वरूपी रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेवूनही या निर्णयाची अद्यापही अंमलबजावणी झाली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, याबाबतची अंमलबजावणी किती कालावधीत होण्याची अपेक्षा आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) राज्यातील जी-१, जी-२ आणि जी-३ या ग्राहक श्रेणीतील वीज ग्राहकांचे भार नियमन दिनांक १८.०३.२०१६ पासून रद्द करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर येथील जानकीबाई आपटे मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहाची मान्यता रद्द करून अन्य सक्षम संस्थेकडे हस्तांतरित करण्याबाबत**

**(१४) ७६९४७ (२१-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथील बालिका आश्रम रस्त्यावरील जानकीबाई आपटे मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहाची मान्यता रद्द करावी व हे वसतिगृह अन्य सक्षम संस्थेकडे सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून हस्तांतरित करण्यात यावे अशी शिफारस समाजकल्याण विभाग, आयुक्त यांनी जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाला दिनांक २१ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय निष्पन्न झाले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०२-२०१८) :** (१) व (२) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी जानकीबाई आपटे मागासवर्गीय मुलीच्या वसतिगृहाची पाहणी केली असता सदर वसतिगृहामध्ये त्रुटी आढळून आल्याने आयुक्त समाज कल्याण पुणे यांच्या पुर्वपरवानगीने सदर वसतिगृहाची मान्यता दि. ०१.०६.२०१७ पासून रद्द करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पश्चिम महाराष्ट्रातील ऊस वाहतूकदारांना ऊस तोडणी मुकादमांनी फसवणूक केल्याबाबत**

**(१५) ७८४६० (२१-०४-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऊस तोडणी मुकादमांनी पश्चिम महाराष्ट्रातील ऊस वाहतूकदारांना ५८ कोटी २८ लाख रूपयांना फसवल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, या प्रकरणी आतापर्यंत किती जणांना अटक केली व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२२-०१-२०१८) :** (१) होय. ऊस वाहतूक ट्रक ट्रॅक्टर मालक संघ, कोल्हापूर यांचे दि.२०.६.२०१६ रोजीचे निवेदनानुसार सदर बाब निदर्शनास आलेली आहे.

(२) व (३) प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर यांनी सदर निवेदनाबाबत साखर कारखान्यांमार्फत करण्यात आलेल्या वाहतुक कराराबाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकार संबंधित कारखान्यांचे संचालक मंडळास आहेत, तसेच ऊस, ट्रक ट्रॅक्टर वाहन मालक व मुकादम यांच्या दरम्यान झालेला करार हा कारखान्याच्या व्यवस्थापनाची अंतर्गत बाब असल्याचे व वाहन मालकांची आर्थिक फसवणूक झाली असल्यास त्या प्रकरणी फसवणूक झालेली व्यक्ती अथवा संघटना त्यांच्या स्तरावर कायदेशीर कारवाई करु शकतात असे दि.१८.१०.२०१६ च्या पत्रान्वये संघटनेस कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील ढोकेनगर, कमलनगर व संजीवनीनगर भागातील वीज पुरवठा सुरळीत होत नसल्याने महिलांनी केलेले आंदोलन**

**(१६) ७८५८१ (२८-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील ढोकेनगर, कमलनगर व संजीवनीनगर भागात वीज पुरवठा सुरळीत होत नसल्याने महिलांनी आडवा फाटा येथील वीज वितरण कंपनीच्या कार्यालया समोर दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या दरम्यान आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार वीज पुरवठा सुरळीत होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर भागातील जुन्या वीज वाहक तारा बदलण्यात आल्या आहेत. तसेच ह्या भागात महावितरणमार्फत आय.पी.डी.एस. योजनेअंतर्गत अतिरिक्त रोहित्राचे काम सप्टेंबर, २०१७ मध्ये सुरु करण्यात आले असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे नेवासा (जि.अहमदनगर) येथील महावितरण कार्यालयात "महावितरण आपल्या दारी" या योजनेंतर्गत दाखल केलेल्या प्रस्तावांबाबत**

**(१७) ७९५१३ (२८-०४-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(१) नेवासा (जि.अहमदनगर) या तालुक्यातील शेतकऱ्यांनी “महावितरण आपल्या दारी” या योजनेंतर्गत अनेक प्रस्ताव दाखल केलेले आहेत परंतु अनेक दिवस उलटून गेल्यावरही या बाबतीत काहीच निर्णय होऊ शकला नाही त्यामुळे स्थानिक शेतकरी अडचणीत सापडले आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच याबाबतचा पायाभूत आराखडा नेवासा महावितरण कार्यालयाने मुख्यालयात पाठविला असून तो देखील अद्याप मंजूर झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०१-२०१८) :** (१), (२) व (३) राज्यात “महावितरण आपल्या दारी” योजनेअंतर्गत केबलद्वारे विद्युत पुरवठा केलेल्या १२९६५४ कृषीपंपांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता रु. १२५८.६७ कोटीची योजना महावितरण कंपनीने तयार केली आहे. त्यामध्ये नेवासा तालुक्यातील ५०४८ कृषी पंपांचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेगांव (जि.बुलढाणा) तालुक्यात रमाई घरकुल योजनेकडे दूर्लक्ष होत असल्याबाबत**

**(१८) ७९९८१ (२१-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव तालुक्यात गेल्या चार वर्षापासून पंचायत समितीच्या निष्काळजीपणामुळे शासनाची महत्वाकांक्षी रमाई घरकुल योजनेकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील चार वर्षात ८३२ घरकुलांपैकी आतापर्यंत ६४५ घरकुलांचे काम पूर्ण झाले असून अद्याप १८७ घरकुलांचे काम अर्धवट स्थितीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने घरकुले तातडीने बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-०१-२०१८) :** (१) नाही.
(२) मागील चार वर्षात ७६१ घरकुलांच्या उद्दिष्टांपैकी ६३५ घरकुले पूर्ण झाली असून, ७८ घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) घरकुलांचे बांधकाम लाभार्थी स्वत: करीत असल्याने, बांधकाम वेळेत पूर्ण करण्याबाबत संबंधीत कार्यान्वयन यंत्रणेकडून लाभार्थ्यांकडे पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यात महावितरण कंपनीच्या सुरु असलेल्या भोंगळ कारभाराबाबत**

**(१९) ८१०१२ (२८-०४-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात वीज वितरण कंपनीचा भोंगळ कारभार सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंद घराचे बिल ६००० रुपये एवढे देऊन वीज वितरण कंपनीचा भोंगळ कारभार उघड झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत अनेकवेळा घराचे बिल २ ते ३ हजार आल्याने जिल्हातील नागरिकांनी महावितरण कंपनीकडे आपल्या तक्रारी दिल्याचे खरे आहे काय,

(४) असल्यास नागरिकांच्या तक्रारींबाबत वीज वितरण कंपनीतील कार्यरत प्रशासनाने लक्ष देणे ऐवजी दुर्लक्षित केले आहे हे ही खरे आहे काय, असल्यास शासन स्तरावरून याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास कार्यवाहीचे स्वरूप कोणते, नसल्यास विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०१-२०१८) :** (१) व (२) अशा आशयाचे वृत्त "दैनिक लोकमत" या वृत्तपत्रामध्ये दिनांक ०७.०२.२०१७ रोजी प्रकाशित झाले होते.

(३) अशा प्रकारच्या तक्रारी महावितरणच्या स्थानिक कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत.

(४) व (५) यवतमाळ जिल्ह्यातील ज्या नागरिकाची वीज बिलाबाबत तक्रार प्राप्त झाली अशा नागरिकाच्या घरातील मीटर व वीज वापर यांची तपासणी करुन स्थळ परिक्षण अहवालानुसार वीज देयक दुरुस्त करुन देण्यात आलेली आहेत. तसेच चुकीचे मीटर वाचन घेतलेल्या मीटर एजन्सीवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून सन २०१६-१७ या वर्षात एकूण रु. ७४,८५०/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

---

**पारगड (जि.कोल्हापूर) किल्ल्यावरील गावठाणाकरीताचे क्षेत्र नियमित करणेबाबत**

**(२०) ८३८७४ (१८-०४-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हास्तरीय समितीने पारगड (जि.कोल्हापूर) किल्लावरील घरासाठी वन हक्क कायद्याच्या कलम ३(१)(अ) अंतर्गत मान्य केले असून गावठाणासाठी वन हक्क मान्य करण्याची तरतूद सदर कायद्याच्या ३(१)(ह) मध्ये आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कलमानुसार गावठाणाचे हक्क मान्य केल्यास वन जमिनीचे वैधानिक स्वरूप न बदलता पारगड किल्ल्यावरील गावठाणाकरीताचे क्षेत्र नियमित करणे शक्य आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पारगड किल्ल्यावरील गावठाणाकरीताचे क्षेत्र नियमित करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०३-०२-२०१८) :** (१) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ नुसार, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना कलम ३ (१)(ज) अन्वये, "सर्व वन ग्रामे, जुनी वसतिस्थाने, भूमापन न केलेली गावे- मग ती महसुली गांवे म्हणून अभिलिखित, अधिसूचित केलेली असोत किंवा नसोत, यांची वसाहत करण्याचा हक्क" प्राप्त झालेला आहे.
(२), (३) व (४) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ च्या कलम ३ (१) (ज) अंतर्गत पारगड किल्ल्यावरील गावठाणाचे क्षेत्र नियमित करण्यासाठी सदर किल्ल्याच्या तटबंदीच्या आत व पायथ्यालगत असलेल्या वनक्षेत्रातील मिरवेल, ता. चंदगड, जि. कोल्हापूर या गावातील सामुहिक वनहक्क दावे मंजूर करण्याच्या अनुषंगाने तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे क्षेत्रिय यंत्रणेस कळविण्यात आले आहे.

---

**पालघर जिल्हयातील एना व जव्हार येथील शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थ्यांसाठी एकही शौचालय नसल्याबाबत**

**(२१) ८४२३४ (२८-०४-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील एना व जव्हार येथील शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थ्यांसाठी एकही शौचालय नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ च्या अंतिम सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशीत काय आढळून आले आहे आणि पालघरसह राज्यातील इतर आश्रामशाळांत पुरेशी शौचालये तातडीने उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०१-२०१८) :** (१) पालघर जिल्हयातील ऐना, ता.जव्हार येथील शासकीय आश्रमशाळेतील मुलांकरीता २ व मुलींकरीता ३ असे एकूण ५ बायो टॉयलेट उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. सद्य:स्थितीत ऐना आश्रमशाळा साखरे येथील जुन्या शेडमध्ये स्थलांतरीत केल्याने मुलांकरीता ५ व मुलींकरीता ५ शौचालय उपलब्ध आहेत.
(२) व (३) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये पालघरसह इतर आश्रमशाळेकरीता शौचालय दुरुस्ती करणे, तसेच नवीन बांधकाम करण्याकरीता प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. त्याअनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील घोडेगांव आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत**
**कोट्यावधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार**

**(२२) ८४७४९ (१६-०५-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील घोडेगांव प्रकल्प कार्यालयांतर्गत आदिवासी समाजातील नागरिकांना देण्यात येणाऱ्या केंद्रिय सहाय्य योजना, वैयक्तिक लाभाच्या योजना, ठक्करबाप्पा योजना, मोगरा, हळद, शेडनेट, शेततळे या योजनांत तत्कालिन प्रकल्प अधिकारी-घोडेगांव यांनी कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबतची तक्रार अध्यक्ष-नॅशनल आदिवासी पिपल फेडरेशन यांनी माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने मा. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी दिनांक ८ ऑगस्ट व २० ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास अप्पर आयुक्त-ठाणे यांचेस्तरावर चौकशी समिती गठित करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल आठ दिवसांत सादर करण्याबाबत कळवूनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घोडेगांव प्रकल्प कार्यालयातील आदिवासींना पुरविण्यात येणाऱ्या योजनांत मोठया प्रमाणावर गैरव्यवहार होऊनही तसेच मा. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी वारवांर निर्देश देऊनही अप्पर आयुक्त, ठाणे यांच्याकडून कारवाई करण्यास वांरवांर जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गैरव्यवहार करणाऱ्या तत्कालिन प्रकल्प अधिकारी, घोडेगांव व मा. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे निर्देशांचे पालन न करणाऱ्या अप्पर आयुक्त-ठाणे यांची विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (१८-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

श्री.मारुती डुबाजी वायाळ, अध्यक्ष, नॅशनल आदिवासी पिपल्स फेडरेशन यांच्या तक्रारींच्या अनुषंगाने तक्रारदारासमवेत दि.०९.१२.२०१६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्यामार्फत आठ दिवसांत चौकशी करण्यात येईल व दोषींविरुध्द एक महिन्यात कारवाई करण्यात येणार असल्याने उपोषण मागे घेण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी तक्रादारास कळविले आहे. त्यानुसार अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांनी त्यांच्यामार्फत श्री.के.एस.माळी, उपायुक्त, अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे व श्री.बी.डी.जैन, प्रकल्प अधिकारी,धुळे यांची संयुक्त चौकशी समिती

गठित केली. सदर समितीने त्यांचा चौकशी अहवाल दि.२१.०१.२०१७ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना सादर केला आहे.
(३) व (४) श्रीम.चेतना मोरे, तत्कालीन सहायक प्रकल्प अधिकारी, श्री.एम. डी. जाधव, कनिष्ठ लिपीक, श्री.पी.एम.घुले, कनिष्ठ लिपीक, श्री. आर. एस.जाधव, उप लेखापाल, श्री.आर.आर. गवळी, लघुटंकलेखक व श्री. अशोक देशमुख,मुख्याध्यापक यांच्याविरुध्द दि.१८.११.२०१७ रोजीच्या ज्ञापनान्वये दोषारोप बजावून एकत्रित विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. सदर एकत्रित विभागीय चौकशी प्रकरण, प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्रांसह दि.१८.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये पुढील कार्यवाहीसाठी सुपूर्द करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांवरील वीजबिलाची वसुली फक्त १९.८९ टक्के असून १८ हजार कोटींची बीजबीले थकीत असल्याबाबत

**(२३) ८७०२५ (०९-०८-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांची वीज देयकांची वसुली फक्त १९.८९ टक्के असून १८ हजार कोटींची देयके थकीत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शेतकऱ्यांनी थकीत वीज देयके भरावीत यासाठी त्यांना प्रोत्सोहित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१) राज्यातील शेतकऱ्यांचे वीज देयकांची वसुली क्षमता माहे मार्च, २०१७ मध्ये १३.८६% होती व एकूण थकबाकी अनुक्रमे १९२७२ कोटी एवढी होती.
(२) राज्यातील कृषीपंपधारक ग्राहकांच्या वीज बिलांचा भरणा करण्याचे अत्यल्प प्रमाण पहाता, कृषीपंप ग्राहकांनी वीज देयकांची थकबाकीची रक्कम भरणे सोयीचे व्हावे यासाठी दिनांक ३१.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना-२०१७" जाहीर करण्यात आली होती. सदर योजनेची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी व योजनेमध्ये जास्तीत जास्त कृषी ग्राहकांनी सहभागी होण्याच्या दृष्टीकोनातून महावितरण कंपनीमार्फत वेगवेगळया माध्यमातून आवाहन करण्यात आले होते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या राज्यातील २७ स्थळांच्या विकासाबाबत**

**(२४) ८७१९३ (०९-०८-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न् डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या राज्यातील २७ स्थळांचा विकास करण्याची योजना शासनस्तरावर तयार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग(१) मधील प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सान्यावि-२०१५/प्र.क्र.१६३/बांधकामे, दिनांक ९/१०/२०१५ मधील कार्यक्रम भाग-१ मधील अनुक्रमांक ६ अनुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनाशी निगडीत असलेल्या स्थळांचा विकास करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच उपरोक्त शासन निर्णयान्वये गठीत केलेल्या राज्यस्तरीय समितीच्या दि.१/८/२०१६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकासाठी ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्वाच्या ठिकाणांचा/स्थळांचा विकास करण्यासाठी एकूण २८ ठिकाणांना मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर बाजार समितीत प्रवेश फीमध्ये अपहार झाल्याबाबत**

**(२५) ८७४५६ (१८-०८-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर बाजार समितीमध्ये शासकीय धान्याची वाहतूक करणारे ठेकेदार व बाजार समितीमधील अधिकाऱ्यांच्या संगनमताने बाजार समितीच्या प्रवेश फी मध्ये मोठ्या प्रमाणात अपहार केला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडहिंग्लज कृषी उत्पन्न बाजार समितीने चंदगड तालुक्यात मौजे तुर्केवाडी (जि.कोल्हापूर) येथे उपबाजार आवारात कृषी उत्पन्न बाजार सुरु करण्याबाबत

**(२६) ८७६०० (१८-०८-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) येथे कृषी उत्पन्न समितीने तुर्केवाडी येथे उपबाजार आवार तयार करुन कृषि उत्पन्न समितीसाठी इमारत बांधली असतानाही तेथे कृषी बाजार भरत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच तेथे कृषी उत्पन्न बाजार भरावा म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) तुर्केवाडी उपबाजाराकरीता गडहिंग्लज कृषी उत्पन्न बाजार समितीने दि.३.९.१९८३ रोजी ६ एकर जमिन स्वनिधीतून खरेदी केली आहे. सदर जागेतील समितीच्या लेआऊट प्रमाणे ३० प्लॉट, नियमन केलेल्या शेतमालाची खरेदी विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या अनुज्ञप्तीधारक व्यापाऱ्यांना वाटप करण्यात आलेले आहेत.

तुर्केवाडी उपबाजार आवारात समितीने शेतकरी व व्यापाऱ्यांना,विहीर,कच्चेरस्ते, टब्युलर शेड, कार्यालयीन इमारत, काटेरी तारेचे कुंपण, सेलहॉल, दुकान गाळे, पाण्याची टाकी, पाईपलाईन वॉचमन केबिन, विद्युतीकरण ह्या सुविधा व कृषीविषयक सुविधा शेतकरी व व्यापाऱ्यांना उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने चंदगड तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ लि. तुर्केवाडी, ताम्रपाणी नागरी पत संस्था मर्यादीत, कोवाड व जिल्हा शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ लि. कोल्हापूर यांना प्लॉट देण्यात आलेले आहेत.

चंदगड तालुक्यातील शेतकऱ्यांकडून प्रामुख्याने काजूबीया, भात, रताळी, बटाटे, हिरवी मिरची व इतर भाजीपाला या पिकाचे उत्पादन होते, सदर तालुक्यातील शेतकऱ्यांचे शेतमाल खरेदी विक्रीचे व्यवहार तुर्केवाडी उपबाजार आवारात सुरु आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा शहर आणि तालुक्यात सातत्याने वीज पुरवठा खंडीत होत असल्याबाबत.**

**(२७) ८७७८८ (०९-०८-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदा शहर आणि तालुक्यात सातत्याने वीज पुरवठा खंडीत होत असल्याने व्यावसायिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये निदर्शनास आणून देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, व्यावसायिकांचे नुकसान होऊ नये तसेच उन्हाळयाच्या उष्णतेपासून नागरिकांचे संरक्षण व्हावे म्हणून वीज पुरवठा नियमित ठेवणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) श्रीगोंदा शहर आणि तालुक्यात लोड शेडिंग व फिडर ब्रेकडाऊन झाल्यामुळे त्यावेळी वीज पुरवठा खंडीत होत होता. परंतु जून, २०१७ च्या महिन्यात फिडरची दुरुस्ती केल्यामुळे आता वीज पुरवठा अखंडीत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ७२ सहकारी संस्था रद्द केल्याबाबत**

**(२८) ९०१९५ (१८-०८-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ७२ हजार सहकारी संस्था निष्क्रिय असल्याचे आढळून आल्यानंतर या संस्था रद्द करण्याची प्रक्रिया सहकार विभागाने सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये कोणकोणत्या सहकारी संस्था रद्द करण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (११-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०१५-१६ या वर्षातील सहकारी संस्थांच्या सर्वेक्षणाअंती बंद/कार्यस्थगित/कागदोपत्री असलेल्या ३९,३५५ व नोंदणीकृत पत्यावर नसलेल्या व ठावठिकाणा नसलेल्या १४,७६९ अशा एकूण ५४,१२४ सहकारी संस्था आढळून आल्यामुळे त्या अवसायनात घेण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. त्यापैकी दि. ३०.०६.२०१७ अखेर २६,८८० संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे.

(२) एकूण ५४,१२४ संस्थांपैकी दि. ३०.०६.२०१७ अखेर २६,८८० संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. त्यामध्ये गृहनिर्माण संस्था व प्रिमायसेस संस्था ३०६७, नागरी/ग्रामीण पतपुरवठा १२३७, पाणीपुरवठा व पाणीवाटप संस्था ४६७२, ग्राहक सहकारी संस्था ९३३, इतर सर्व प्रकारच्या संस्था १५५७९ या संस्थांचा प्रामुख्याने समावेश आहे.

(३) बंद/कार्यस्थगित/ठावठिकाणा नसलेल्या ५४,१२४ संस्थांपैकी एकूण ४३,४१४ संस्थांवर महाराष्ट्र सहकार संस्था अधिनियम १९६० अन्वये अवसायनात घेण्याची कारवाई करण्यात आली.

अवसायनातील संस्थांपैकी एकूण २६,८८० संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे व ९३९ संस्थांचे पुनर्रचना करण्यात आली आहे. उर्वरित संस्थांच्या अवसायन कामकाजाची प्रक्रिया चालू आहे.

---

**रायगड जिल्हयातील उरण, नवी मुंबई, पनवेल, खालापूर या भागात अवेळी वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रकार वाढल्याबाबत**

**(२९) ९१२७५ (०९-०८-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील उरण, नवी मुंबई, पनवेल, खालापूर या भागात अवेळी वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रकार वाढल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अचानक वीज पुरवठा खंडीत होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या भागात वीज पुरवठा सुरळित व नियमित होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) माहे जून, २०१७ मध्ये पावसाची सुरुवात झाल्याने अतिवृष्टि, वादळवारा व वीजांचा कडकडाट यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे काही भागात वीज पुरवठा खंडित होण्याच्या प्रकारात वाढ झाली होती.

(३) ग्राहकांना अखंडीत वीज पुरवठा करण्याचा महावितरण कंपनीकडून सातत्याने प्रयत्न सुरु आहे.महावितरणमार्फत विद्युत उपकरणे सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य स्थितीत राहण्यासाठी

वेळोवेळी आवश्यक ती देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात येतात. त्यासाठी प्रामुख्याने दरवर्षी O & M अंतर्गत कामे केली जातात. तसेच पायाभूत आराखडा, पं. दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना व एकात्मिक ऊर्जा विकास योजना इ. योजनांतर्गत देखभाल व दुरुस्तीची कामे प्रस्तावित आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत अवामी बँकेमध्ये ठेवण्यात आलेल्या कोट्यावधी रुपयांच्या मुदतठेवींबाबत**

**(३०) ९१७८५ (१८-०८-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत अवामी बँकेत मुदतठेव म्हणून ठेवण्यात आलेली कोट्यावधींची रक्कम व्याजासह परत मिळाली आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी महामंडळास मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) मधील प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) तसेच महामंडळाच्या नुकसानीस जबाबदार असलेल्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०१-२०१८) :** (१) व (२) अवामी मर्कंटाईल को ऑपरेटीव्ह बॅकेमध्ये महामंडळाने नियमबाहयपणे रु.२ कोटी मुदत ठेव ठेवली. त्यापैकी रु.१,०५,४९,०१७/- मुददल स्वरुपात महामंडळास प्राप्त झाली आहे. उर्वरित रु.९४,५०,९८३/- मुददल अधिक त्यावरील बॅक दराने येणारे व्याज अद्याप प्राप्त झालेले नाही. त्याबाबत न्यायालयात दावा चालू आहे.
(३), (४) व (५) सदर प्रकरणी चौकशी अधिकारी यांच्या अहवालानुसार तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांना दोषी ठरविल्याने त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले असून त्यांच्या विरोधात आर्थिक गुन्हेअन्वेषण विभाग, मुंबई यांचेमार्फत फौजदारी खटला चालू असून सदरची बाब न्यायप्रविष्ट आहे.

---

**मु.पो.डोमगाव (जि.उस्मानाबाद) येथील जतन केलेल्या पुरातन समाधी मंदिरास वीज कनेक्शन उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३१) ९१९५० (०९-०८-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.डोमगाव (जि.उस्मानाबाद) येथील जतन केलेल्या पुरातन समाधी मंदिरामध्ये अद्यापपर्यंत वीज कनेक्शन दिले गेलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समाधी मंदिर हे अत्यंत पुरातन असून प्रकल्प उभारणीच्या वेळेससुध्दा सदरील मंदिर न काढता चारही बाजूंनी भराव टाकून जतन केलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी सदरील पुरातन समाधी मंदिरास वीज कनेक्शन देण्यात यावे अशी विनंती दिनांक २८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा. ऊर्जा मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०१-२०१८) :** (१), (२), (३) व (४) उस्मानाबाद जिल्ह्यातील मौजे डोमगाव येथील जतन केलेल्या पुरातन समाधी मंदिरासाठी “श्री कल्याण स्वामी मठसंस्थान” या नावाने (ग्राहक क्र. ६०३१८०४९४४३६) महावितरण कंपनीकडून विद्युत कनेक्शन देण्यात आलेले असून सदरील कनेक्शन सद्यस्थितीत चालू आहे.

---

## शासनाने कर्जबाजारी शेतकऱ्यांचे स्वतंत्र खाते उघडून दहा हजार रूपयांचे कर्ज जका करण्याबाबत

**(३२) ९२००८ (१८-०८-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या कर्जाची हमी घेत दहा हजार रूपयांचे कर्ज शेतकऱ्यांचे स्वतंत्र खाते उघडून देण्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आदेशित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील बहुतेक शेतकरी सोसायटीतून कर्ज घेतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांचे खाते सोसायटीत असल्याने प्रतिज्ञापत्र शेतकऱ्यांकडून आणि कर्ज सोसायटीच्या नावे कसे द्यायचे, असा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाची निश्चित भूमिका काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (०५-०१-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) नाही, अशी बाब आढळून आली नाही. व्यापारी बँकामार्फत सदरचे कर्ज थेट शेतकऱ्यांना स्वतंत्र खाते उघडून वितरित करण्यात आले आहे. जिल्हा बँकांच्या बाबतीत संबंधित विकास संस्थेच्या नावे स्वतंत्र खाते उघडून संबंधित सभासद शेतकऱ्यांना कर्ज रक्कम वितरित करण्यात आली आहे.
(४) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण ०६१७/प्र.क्र. ११७/२-स, दि. १४/६/२०१७ अन्वये याबाबतचे धोरण जाहीर करण्यात आले असून दि.३१/८/२०१७ अखेर राज्यातील ५२९६१ शेतकऱ्यांना रू.५२७७.२० लाख रक्कमेचे कर्जवाटप केले आहे.

---

**शिराळा (जि.सांगली) तालुक्यात विज ग्राहकांना विज मीटर व ट्रान्सफॉर्मर तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३३) ९२१४८ (०९-०८-२०१७). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराळा (जि.सांगली) तालुक्यात घरगुती वीज जोडणी व शेतीपंपाची जोडणीसाठी वीज मीटर उपलब्ध नसल्यामुळे मोठया प्रमाणावर शेतकरी जोडणीपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच या तालुक्यातील विज ग्राहकांना शेतीपंप, घरगुती वापर व लघु उद्योगासाठी पुरेशा दाबाने विज पुरवठा होण्याकरिता ट्रान्सफॉर्मर उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी विज मंडळाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

शिराळा तालुक्यातील ३१ जुलै, २०१७ अखेर प्रलंबित सर्व २६६ घरगुती वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत. तसेच १ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर, २०१७ अखेर प्रलंबित असणाऱ्या २६८ घरगुती वीज जोडण्या देण्याचे काम सुरु आहे.

३१ जुलै, २०१७ अखेर प्रलंबित असलेल्या सर्व ६५ कृषीपंपाच्या वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत. १ ऑगस्ट, २०१७ ते ३० सप्टेंबर, २०१७ अखेर प्रलंबित असणाऱ्या १०४ कृषीपंप जोडण्यांकरिता आवश्यक मीटर्स उपलब्ध असून वीज जोडणी देण्याचे काम सुरु आहे.

(२) व (३) पुरेशा दाबाने वीज पुरवठा होत नसल्याबाबतच्या तक्रारी निवारण करण्यासंदर्भात लागणाऱ्या पायाभूत सुविधा कामाची अंदाज पत्रके तयार करण्यात आली असून त्यासाठी लागणाऱ्या निधीची मागणी जिल्हा विकास नियोजन समिती, सांगली यांचेकडे करण्यात आली असून निधी उपलब्ध होताच कामे करण्यात येतील.

पं. दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण विद्युतीकरण योजना भाग-१ अंतर्गत शिराळा तालुक्यामध्ये ३३/११ के.व्ही गवळेवाडी व ३३/११ के.व्ही. तडवळे ही दोन उपकेंद्रे व ३३/११ के.व्ही चिखली उपकेंद्रामध्ये ५ एमव्हीएचे अतिरिक्त रोहित्र मंजूर असून सदरची कामे सुरु आहेत. तसेच दीन दयाळ उपाध्याय ग्रामीण विद्युतीकरण योजना भाग-२ अंतर्गत ६३ के.व्ही.ए.ची १४ व १०० केव्हीए ची २८ रोहित्रे, २१.६९ कि.मी. उच्चदाब वाहिनी व ३९.९४ कि.मी.लघुदाब वाहिनी मंजूर असून ही कामे सुध्दा सुरु आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

## खान्देशात विजेच्या धक्क्याने ८१ नागरिकांच्या झालेल्या मृत्यूबाबत

**(३४) ९२२९८ (०९-०८-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खान्देशात विजेच्या धक्क्याने सव्वा वर्षात ८१ नागरिकांचा मृत्यू झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरांमधील, गावांमधील तसेच शेतांमधील लोंबकळणाऱ्या तसेच जीर्ण झालेल्या तारा जीवघेण्या ठरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा घटनांवर प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०१-२०१८) :** (१) जळगांव, धुळे व नंदूरबार ह्या जिल्ह्यांमध्ये माहे एप्रिल, २०१६ पासून जून, २०१७ पर्यंत एकूण ७८ व्यक्तिंचा वीजेच्या धक्क्याने मृत्यू झालेला आहे. त्यापैकी ३१ बाह्य व्यक्तींचा मृत्यू हा त्यांच्या घराच्या आवारात/ हद्दीत झालेला आहे.

(२) व (३) धोकादायक तसेच जीर्ण झालेल्या तारा बदलण्याकरिता निधीची मागणी महावितरण कंपनीच्या जळगांव, धुळे, नंदुरबार या मंडळ कार्यालयांनी जिल्हा नियोजन समितीकडे केलेली आहे. त्याचप्रमाणे काही कामे ही जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना देण्यात आलेली असून कामे प्रगतीपथावर आहेत. काही कामे महावितरण कंपनीमार्फत सुरु असलेल्या इन्फ्रा-२, दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना (DDUGJY) व आय.पी.डी.एस (IPDS) या योजनांमध्ये समाविष्ट असून सदरची कामे प्रगतीपथावर आहेत. विद्युत अपघात टाळण्यासाठी व वीज विषयक जनजागृती करणेसाठी जळगांव, धुळे व नंदुरबार मंडळ कार्यालयांनी विद्युत सुरक्षा सप्ताह आयोजित केलेला होता. त्या निमित्ताने जागोजागी विद्युत सुरक्षा संदर्भात सूचना फलक लावण्यात आले होते. तसेच शहरातील शाळांमध्ये विद्युत सुरक्षेसंदर्भात उपक्रम राबविण्यात आले व प्रबोधन करण्यात आले होते. विविध ठिकाणी विद्युत सुरक्षा जनजागृती रॅलीचे आयोजन देखील करण्यात आले होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सालणा ते अनखळी (ता.जि.हिंगोली) या रस्त्यावर विद्युत पुरवठा करणाऱ्या तारा लोंबकळत असल्याबाबत

**(३५) ९२५०७ (०९-०८-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालणा ते अनखळी (ता.जि.हिंगोली) या रस्त्यावर विद्युत पुरवठा करणाऱ्या तारा अधांतरी असून या लोंबकळऱ्या तारांना बांबूंचा आधार दिला असल्यामुळे तेथील नागरिकांच्या जिविताला धोका असल्याचे माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी अनेक जागी विद्युत खांब वाकलेले असल्याबाबत तक्रार केली असता वीज कंपनीने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे वाहनचालकांनाही अडथळा निर्माण झाला असून अपघात होण्याची शक्यता असल्याने शासनाने याबाबत पाहणी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०२-२०१८) :** (१), (२) व (३) माहे एप्रिल, २०१७ व मे, २०१७ मध्ये झालेल्या वादळी वारा व पावसामुळे साळणा ते अनखळी रस्त्यावरील पोल वाकल्यामुळे काही ठिकाणी तारा लोंबकळत होत्या. महावितरण कंपनीने कंत्राटदाराकडून सदर सर्व पोल सरळ करुन घेऊन लोंबकळणाऱ्या तारा व्यवस्थित करुन घेण्याची कार्यवाही तातडीने केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अण्णाभाऊ साठे महामंडळातील कोट्यावधी रुपयांच्या गैरव्यवहाराचा न्यायवैद्यक अहवाल**

**(३६) ९२६०९ (१८-०८-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अण्णाभाऊ साठे महामंडळातील कोट्यावधी रूपयांच्या गैरव्यवहाराचा न्यायवैद्यक अहवाल माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हे अन्वेषन विभागाकडे कडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामंडळाच्या निवडक १३ जिल्ह्यात केलेल्या तपासनीतून हा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले असून राज्यातील उर्वरीत जिल्ह्याची तपासणी अद्याप करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अहवालात काय आढळून आले, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(४) तसेच या अहवालानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-०१-२०१८) :** (१) होय.
(२) होय.

गुन्हे अन्वेषण विभागाने सूचविल्यानुसार ज्या जिल्हयांतून मोठया प्रमाणावर रोख रक्कम काढण्यात आल्या आहेत किंवा ज्या जिल्हयात मोठया प्रमाणात कर्जवितरण झालेले आहे. अशा १३ जिल्हयांचे या प्रकरणानुषंगाने न्याय सहाय्यक लेखापरिक्षण करण्यात आलेले आहे.
(३) किती रक्कमेचा अपहार झाला? सदर अपहारात कोण व्यक्ती जबाबदार होत्या तसेच हा अपहार कोणाच्या आदेशान्वये करण्यात आला याबाबतची माहिती सदर अहवालात नमूद केली आहे.

(४) सदर अहवालानुसार, करण्यात आलेल्या अपहाराबाबत व वित्तीय अनियमिततेबाबत संबधित अधिकारी/कर्मचारी यांना, नोटीसा बजावण्यात आलेल्या असून त्यांचा खुलासा मागविण्यात आलेला आहे. खूलासा समाधानकारक नसलेल्या संबधितावर अपहाराबाबतचे गुन्हे नोंदविण्याची कारवाई करण्यात आली असून, अपहार केलेल्या रक्कमेची एकरक्कमी वसूली करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील कोलाम जमातीचे वास्तव्य असलेल्या गावांमध्ये मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत**

**(३७) ९२८९० (०९-०८-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील कलीगुडा, रायपूर, खडकी, धनकदेवी, काकबन, पाटागुडा, गुडशेला, येल्लापूर, लांबोरी, बापूराव गुडा, टाटाकोहाळ, भूरीयेसापूर, घाटराईगुडा, चिखली, धरमेरा जाला गुडा, आनंदगुडा, भोक्सापूर येथे कोलाम जमातीचे वास्तव्य आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावांमध्ये अद्यापही मुलभूत सुविधांचा पूर्णपणे अभाव असल्यामुळे कोलाम जमातीचे जीवन अत्यंत हलाखीचे असून उदनिर्वाहाचे कोणतेही साधन उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोलाम जमातीचे जीवनमान उंचविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे तसेच सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कोणती विशेष यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (३०-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) प्रत्यक्ष प्रशासकीय यंत्रणेनी स्थळभेट देऊन कोलाम विषयक आराखडा तयार करण्यात आलेला असून याबाबत जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपुर तसेच प्रकल्प कार्यालय, चंद्रपुरमार्फत सर्व कार्यन्वयन यंत्रणांचा नियमित आढावा धेण्यात येत आहे.
तसेच कोलाम जमातीचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रकल्प अधिकारी, चंद्रपुर मार्फत घरकुल, ठक्करबापा सुधार योजना, केंद्रिय योजना व न्युक्लिअस बजेट योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ देण्यात येत आहे

---

**राज्यातील आदिवासी विकास विभागांतर्गत अनुदानीत आश्रमशाळांमध्ये कंत्राटी सुरक्षा रक्षकाच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(३८) ९३०७६ (०९-०८-२०१७). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास विभागांतर्गत अनुदानीत आश्रमशाळांमध्ये कंत्राटी तत्वावरील सुरक्षा रक्षकाला दरमहा रु.५०००/- मानधन देण्याबाबत माहे जून, २०१६ मध्ये शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान कंत्राटी सुरक्षा रक्षकांना शासनाच्या वर्ग-४ कर्मचाऱ्यांच्या वेतनाप्रमाणे वेतन देण्याबाबत निदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत राज्यातील अनुदानीत आदिवासी आश्रमशाळा संस्था चालक संघटनेने मा.मंत्री (आदिवासी विकास) यांच्यासमवेत माहे एप्रिल, २०१७ मध्ये बैठकीत मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०३-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) या बाबत विधी व न्याय विभागाचा सल्ला घेवून त्या अनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**चंद्रपूर औष्णिक वीज केंद्र युनिट क्रमांक ३ मध्ये एका कंत्राटी कामगाराचा झालेला मृत्यू**

**(३९) ९३३८१ (०९-०८-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर औष्णिक वीज केंद्र युनिट क्रमांक ३ मध्ये विजेचा धक्का लागून एका कंत्राटी कामगाराचा दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) त्यानुसार मृत कामगाराच्या कुटुंबियांना शासनाने कोणती तातडीची मदत दिली वा देण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदरचा अपघात झाल्यानंतर महानिर्मिती कंपनीकडून दिनांक १५.०६.२०१७ रोजी दुर्गापूर पोलीस ठाणे, चंद्रपूर येथे फिर्याद दाखल करण्यात आली. तसेच कारखाने निरीक्षक व विद्युत निरीक्षक, चंद्रपूर यांना अपघाताची लेखी सूचना देण्यात आली. दिनांक १६.०६.२०१७ रोजी उपसंचालक, (औ. सुरक्षा व आरोग्य) आणि विद्युत निरीक्षक, चंद्रपूर यांनी अपघात स्थळी भेट देऊन चौकशी केली आहे.

विद्युत निरीक्षक, चंद्रपूर यांनी महानिर्मितीने सादर केलेली अपघाताची सूचना व अहवाल, घटनास्थळ पंचनामा, अपघात स्थळाचे निरीक्षण करुन दिनांक ०३.०७.२०१७ व ०४.०७.२०१७ रोजी दिलेल्या निष्कर्षानुसार संच क्र. ३ ESP मध्ये कंत्राटी कामगार जमिनीपासून ३० फूट उंचीवर वेल्डिंग करीत होते. वेल्डिंगची जागा बदलत असतांना त्यांच्या डाव्या हातातील वेल्डिंग होल्डर चुकीने त्यांच्या छातीला स्पर्श झाल्याने सदर प्राणांतिक अपघात घडला आहे.

(३) मे. इंटेक इंजिनिअरिंग सर्विसेस, चंद्रपूर या कंत्राटदाराने तातडीची मदत म्हणून अंत्यविधीसाठी रु. १५,०००/- व रु. १,५०,०००/- रोख दिले आहेत. तसेच महानिर्मिती कंपनीकडून सांघिक सामाजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत रु. २ लाख मृत कामगाराच्या वारसास देण्यात आली आहे. तसेच कर्मचारी राज्य विमा कायदा, १९४८ अंतर्गत नुकसान भरपाई देण्याबाबत ऑनलाईन अपघात अहवाल दिनांक १५.०६.२०१७ रोजी सादर केला असून त्यानुसार नुकसान भरपाईची रक्कम, कर्मचारी राज्य विमा योजना कार्यालयाकडून वारसास देण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात मार्केट यार्डमधील वाहतूक कोंडीच्या समस्येबाबत

**(४०) ९३६३७ (१८-०८-२०१७). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात वाढलेले डमी आडते, नियमांचे उल्लंघनाबरोबर व्यापाऱ्यांकडून जागेच्या अतिरिक्त वापरामुळे मार्केट यार्डामधील वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली असून, ती दूर करण्यासाठी बाजार समिती प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याची बाब दिनांक ३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,वाहतुक कोंडीमुळे बाजारात शेतीमाल घेऊन येणारी वाहने गाळ्यावर वेळेवर पोहोचत नसल्याने, लिलाव उशिरा होतो व शेतकऱ्यांना अपेक्षित भाव मिळत नाही, हे ही खरे आहे काय काय,

(३) असल्यास, उक्त विषयी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०६-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) नाही.
(३) वाहतूक कोंडी होऊ नये,शेतीमाल तात्काळ गाळ्यावर वा दिलेल्या पर्यायी जागेवर पोहचावा यासाठी आवश्यक उपाययोजना बाजार समिती करत असून त्यासाठी बाजार समितीने स्वतंत्र नियंत्रण कक्षाची स्थापना केली आहे. दि. ३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास बाजार आवारामध्ये शेतीमाल घेऊन येणारी वाहने वेळेवर गाळ्यावर पोहचवून वेळेवर शेतीमाल खाली करून शेतीमालाची विक्री वेळेवर झालेली आहे. पर्यायाने शेतकऱ्यांचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. तसेच बाजार आवारात अनधिकृत आडते व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेविरुद्ध बाजार समिती प्रशासनाकडून तात्काळ कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील चर्मकार समाजाच्या प्रलंबित प्रस्तावाबाबत**

**(४१) ९३७७० (१८-०८-२०१७). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संत रोहिदास महामंडळामार्फत अनुसूचित जाती मधील नागरिकांना त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी शासनाकडून आर्थिक मदत देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चालू वर्षाकरिता परभणी जिल्ह्यातील किती प्रस्ताव महामंडळाकडे प्रस्तावित आहेत,
(३) असल्यास,चालू वर्षातील एकही प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय, त्याचे कारण काय आहेत,
(४) असल्यास, उपलब्ध असलेले प्रस्ताव मंजूर करणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०१-२०१८) :** (१) होय.
चर्मकार समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या व्यक्तींच्या विकासाकरीता या महामंडळामार्फत विविध कर्ज योजना राबविण्यात येतात.
(२), (३), (४) व (५) परभणी जिल्ह्यात महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या योजना अंतर्गत माहे ऑगस्ट, २०१७ अखेरपर्यत १०३ अर्ज प्राप्त झाले त्यापैकी ३१ प्रस्ताव मंजूर केले असून, ७२ प्रस्ताव शिल्लक आहेत. महामंडळाकडे शिल्लक असलेल्या एन.एस.एफ.डी.सी.च्या निधीमधून इतर व्यवसायासाठी कर्ज मंजूर करण्यात आलेले आहे. परंतू उर्वरीत योजनांसाठी महामंडळाकडे निधी शिल्लक नसल्याने, सदरचा निधी एन.एस.एफ.डी.सी. कडून प्राप्त करण्यास शासन हमी देण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

---

## महागांव तालुक्यात (जि. यवतमाळ) डीपी फुटल्याने उडालेल्या ऑईलने दोन महिला जखमी झाल्याबाबत

**(४२) ९३७७३ (०९-०८-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागांव तालुक्यात (जि.यवतमाळ) डीपी फुटल्याने उडालेल्या ऑईलने दोन महिला जखमी झाल्याची घटना माहे जून, २०१७ च्या पहिल्या आठवडयात घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच येथे या कालावधीत चार दिवस वीज पुरवठाही खंडीत झाला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या घटनेची चौकशी केली आहे काय, त्यानुसार या जखमीना शासनाने कोणती तातडीची मदत दिली वा देण्यात येत आहे,तसेच वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर घटनेनंतर दोन तासाच्या कालावधीमध्ये नजीकच्या वितरण रोहित्रावरुन सदर परिसरातील वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला.महावितरणकडून सदर घटनेबाबत विभागीय चौकशीचे आदेश संबंधित विभागाला देण्यात आलेले आहेत. तसेच दोन्ही जखमी महिलांनी लगेचच दवाखान्यात उपचार घेतला असून त्या सुस्थितीत आहेत. सदर नादुरुस्त रोहित्र बदलण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विकास सोसायट्या सुधारण्यासाठी आर्थिक गुंतवणूक करण्याच्या दिलेल्या आदेशाबाबत

**(४३) ९४३०३ (१८-०८-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मोडकळीस आलेल्या विविध कार्यकारी सोसायट्या सुधारण्यासाठी जिल्हा बँकांनी पुढाकार घेऊन उक्त सोसायट्यांमध्ये आर्थिक गुंतवणूक करण्यासाठी सहकार आयुक्त यांनी जिल्हा बँकांना पत्र दिले असल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, राज्यात सुमारे २१ हजार ७० विकास सोसायट्या असून ७५ टक्के सोसायट्या अडचणीत असल्यामुळे या सोसायट्यांचे कर्जवाटप बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत किती सोसायट्यांमध्ये जिल्हा बँकेने गुंतवणूक केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०५-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे. जिल्हा बँकांच्या प्रत्यक्ष आर्थिक गुंतवणूकीचा यात समावेश नाही. काही बाबींवर आर्थिक व तांत्रिक मदत करण्याचे आवाहन सहकार आयुक्त कार्यालयामार्फत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना करण्यात आले आहे.

विविध कार्यकारी सहकारी संस्था मजबुतीकरणासाठी लहान व आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या वि.का.स. संस्थांच्या सचिवांचा पगार तीन वर्षासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी करणे, या संस्थांच्या संचालक मंडळाची निवडणूक घेणेसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करुन देणे, सदर संस्थांचे संगणकीकरण करणे, या संस्थांची अनिष्ठ तफावत कमी करण्यासाठी कार्यवाही करणे, सदर संस्थांना विविध व्यवसाय सुरु करण्यासाठी आर्थिक सहाय्य व तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करुन देणे, सर्व प्रकारच्या कर्जाच्या वसूलीसाठी बँकेच्या संचालक मंडळाने नियमित आढावा घेणे या बाबींचा यात समावेश आहे.

(२) फेब्रुवारी, २०१७ अखेर राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये २१०७० वि.का.स. संस्था कार्यरत असल्याचे, दि.३१/३/२०१६ अखेर लेखापरिक्षण पूर्ण झालेल्या संस्थांपैकी १२२८१ संस्था तोट्यात असल्याचे व त्यापैकी ७७९९ वि.का.स. संस्था अनिष्ठ तफावतीमध्ये असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पुणे यांच्या पातळीवर याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बार्टी (जि.पूणे) येथील अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येणाऱ्या १०३ लॅपटॉपचा अपहार केला असल्याबाबत.**

**(४४) ९४६२३ (०९-०८-२०१७). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडून (बार्टी) पीएचडी आणि एमफील करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येणाऱ्या १०३ लॅपटॉपचा संस्थेतील माहिती-तंत्रज्ञान विभागातील प्रकल्प अधिकाऱ्यांनी सन २०१५ ते २०१७ या कालवधीत गैरव्यवहार केल्याचे माहे जून,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ,याप्रकरणी बार्टीची ५१ लाख ६८ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील पाच वर्षामध्ये बार्टी संस्थेच्या पीएचडी आणि एमफील करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती म्हणून किती लॅपटॉप देण्यात आले,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे ही खरे आहे.
(३) मागील पाच वर्षामध्ये बार्टी संस्थेच्या पीएचडी आणि एमफील करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती म्हणून एकूण ३५६ लॅपटॉप देण्यात आले आहेत. तसेच १८ विद्यार्थ्यांना लॅपटॉप वितरीत करण्याची प्रक्रिया चालू आहे.
(४) व (५) बार्टीतील संगणक विभागाचे अंतर्गत लेखा परीक्षण करण्यात आले असून त्यात प्रथम दर्शनी अपहर झाल्याचे दिसून आल्याने संबंधित प्रकल्प अधिकारी श्री.राहुल रणवीर यांना कामावरून काढून टाकण्यात आले आहे.

तसेच त्यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन, कोरेगाव पार्क, पुणे येथे दि.२९/०५/२०१७ रोजी FIR दाखल करण्यात आलेला आहे. प्रकरण पोलीस कार्यवाहीत असून पोलिसांमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

## नाशिक जिल्हयातील उद्योग बंद पडल्याबाबत

**(४५) ९५३७९ (०३-०१-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील गत पाच वर्षात १८८ तर दहा वर्षात १०४७ उद्योग विविध कारणांनी बंद पडल्याची बाब माहे सप्टेंबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उद्योगांवर आधारीत तीस हजारापेक्षा अधिक कामगार बेरोजगार झाले आहेत तसेच शासनाने जाहिर केलेल्या आकडेवारीनुसार राज्यात ४४ हजार ७९५ उद्योग बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी बंद पडलेले उद्योग उर्जितावस्थेत आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०२-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सन २००८ मध्ये झालेल्या चौथ्या अखिल भारतीय औद्योगिक प्रगणेनुसार नाशिक जिल्यातील बंद असलेल्या सुक्ष्म,लघु व मध्यम उद्योग घटकांची संख्या २०९२ इतकी आहे.सन २००८ नंतर औद्योगिक प्रगणना झालेली नाही.
(२), (३) व (४) सप्टेंबर २०१५ अखेरपर्यंत नाशिक जिल्हयातील नोंदणीकृत सुक्ष्म,लघु व मध्यम उद्योग घटकांची संख्या १९०४६ इतकी आहे.या उद्योग घटकांमधील एकूण रोजगार निर्मिती एकूण १,५४,५४३ असून संयंत्र गुंतवणूक रू.४,२७,५५७ रू.लक्ष करण्यात आली आहे.

उद्योग व रोजगार निर्मिती क्षमतेत वाढीसाठी सामुहीक प्रोत्साहन योजना-२०१३, महाराष्ट्र औद्योगिक समूह विकास योजनेअंतर्गत औद्योगिक समुहांना क्षमता वृध्दी व सामाहिक सुविधा केंद्र निर्मिती करणेसाठी निधी उपलब्ध करून देणे तसेच औद्योगिक

विकासाला चालना देण्यासाठी औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मिती व विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे इ. योजना राबविण्यात येतात. सुधारित बीज भांडवल योजना व पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमाद्वारे सुशिक्षीत बेरोजगारांना उद्योग उभारणीसाठी मार्जिन मनी व बँक कर्ज उपलब्ध करून देण्यात येते.

बंद कारखाने सुरु करण्याबाबत शासनाकडून वेळोवेळी उपाययोजना करण्यात येतात. मुंबई सहाय्यक उपक्रम (खास उपबंध) अधिनियम, १९५८ नुसार बेकारीस प्रतिबंध करण्यासाठी किंवा बेकारीचे निवारण करण्यासाठी उपाययोजना म्हणून आजारी उद्योग घटकास सहाय्यक उपक्रम घोषित करण्यात येते.

---

**आदिवासी विकास विभागातील गैरव्यवहार प्रकरणी सादर केलेल्या चौकशी अहवालांचा अभ्यास करण्यासाठी शासनाने पी.डी. करंदीकर यांची नियुक्ती केल्याबाबत**

**(४६) ९८१०० (२९-१२-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.बसवराज पाटील (औसा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास विभागामार्फत सन २००४ ते २००९ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध योजनांसाठी कोटयावधी रुपयांच्या गैरव्यवहाराची चौकशी करणाऱ्या न्या. गायकवाड समितीला मोठया प्रमाणात गैरव्यवहार निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालांचा अभ्यास करुन दोषारोप निश्चित करण्यासाठी शासनाने पी.डी. करंदीकर यांची नियुक्ती केल्याची बाब दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची छाननी पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-०२-२०१८) :** (१) ते (४) मा.न्या.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या चौकशी समितीने शासनास सादर केलेल्या अहवालाची छाननी करुन, शासनामार्फत करावयाच्या पुढील कार्यवाहीसंदर्भात शासनास मार्गदर्शन करण्याकरीता श्री.पी.डी. करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली दि.२९.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये पूर्णवेळ एक सदस्यीय समिती गठित करण्यात आलेली आहे.

करंदीकर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.

---

**मेहकर (जि.बुलढाणा) बस स्टँड समोरील के.ए.जैस्वाल यांच्या दारुच्या दुकानाच्या जागेचे दस्ताऐवज बनावट असल्याबाबत**

**(४७) ९८२९३ (२९-१२-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) बस स्टँड समोरील के.ए.जैस्वाल यांचे दारुचे दुकान डि.पी. प्लॅनिंगमधील १५ मिटर रोडवरील जागेवर असून सदरहू जागा ही नगरपरिषद यांचे हद्दीत नसून त्या जागेचे बनावट दस्तऐवज देऊन उत्पादन शुल्क अधिकारी व न.प. मुख्याधिकारी यांच्याशी आर्थिक व्यवहार केल्याप्रकरणी दिनांक २४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास राज्य उत्पादन शुल्क मंत्री, जिल्हाधिकारी, बुलढाणा तसेच संबधित अधिकारी यांच्याकडे ग्रामस्थांनी लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबधित दुकानावर व मालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-०१-२०१८) :** (१) (२) व (३) होय. याप्रकरणी प्राप्त दि.२४.९.२०१७ च्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, चिखली यांनी चौकशी अहवाल सादर केला आहे. मुख्याधिकारी, नगर परिषद, मेहकर यांनी दि.११.१०.२०१७ व दि.५.१२.२०१७ च्या पत्रान्वये, सदर अनुज्ञप्ती विकास आराखडयात १५ मीटर डि.पी. रोड प्रस्तावित केलेल्या रस्त्याने बाधीत होत नसल्याचे कळविले आहे. नगर परिषद, मेहकर यांचेकडून सन २००४ न.प. ठराव क्र.९ नुसार, सदर अनुज्ञप्तीस ना-हरकत प्रमाणपत्र व बांधकाम अधिकृत असल्याबाबतचा दाखला देण्यात आला आहे. तथापि, प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, मुख्याधिकारी, नगर परिषद, मेहकर यांनी दि.३०.१०.२०१७ रोजी सदर जागेच्या ताबे पावतीस स्थगिती दिली आहे. यामुळे अनुज्ञप्तीधारकाने मा.दिवाणी न्यायालय, मेहकर येथे दिवाणी दावा दाखल केला आहे. मा.न्यायालयाच्या जैसे थे चे आदेश असल्याने कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कांदा पिकासाठी भांडवली खर्च केल्यानंतर कांदा विक्रीतून तोटा झाल्याबाबत**

**(४८) ९८५६८ (०२-०१-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कांदा पिकासाठी सुमारे चार हजार ४३१ कोटी रुपये भांडवली खर्च केल्यानंतर देखील त्यांना वर्षभरात कांदा विक्रीतून २५०० कोटी रुपयेच इतकेच मिळाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना जवळपास २ हजार कोटींचा तोटा झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०२-२०१८) :** (१) व (२) नाही.

मागील वर्षाच्या तुलनेत नाशिक जिल्ह्यातील कांद्याची आवक व मिळालेली किंमत पहाता चालू वर्षात एप्रिल ते ऑक्टोबर,२०१७ या महिन्यात सरासरी रुपये ९८२/- प्रति क्विंटल दर शेतकऱ्यांना मिळालेला आहे. तर मागील वर्षात सरासरी दर रुपये ६५९/- प्रति क्विंटल होता.

(३) कांदा उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या मालासाठी योग्य भाव मिळावा याद्दष्टीने देशातील इतर राज्यात कांदा पाठविणे सुलभ व्हावे, यासाठी रेल्वेचे जादा वॅगन व रॅक्स उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.तसेच FPO मार्फत पंजाब, हरियाणा व दिल्ली या ठिकाणी कांदा विक्रीच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. त्याचबरोबर नाफेडच्यावतीने बिहार व पं.बंगालमध्ये कांदा विक्रीसाठी सुविधा उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे हिरडव (ता.लोणार, जि.बुलढाणा) येथील शासनमान्य देशी दारुच्या दुकानामध्ये किडे असलेल्या सिलबंद देशी दारुची विक्री होत असल्याबाबत**

**(४९) ९८६४३ (२९-१२-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हिरडव (ता.लोणार, जि.बुलढाणा) येथील शासनमान्य देशी दारुच्या दुकानामध्ये किडे असलेल्या सिलबंद देशी दारुची विक्री होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दुकानातून दूषित दारुची विक्री होत असून दुर्घटना घडण्याची शक्यता असल्याने दुकानावर तात्काळ कारवाई करण्याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी जिल्हा अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय बुलडाणा, यांच्याकडे तक्रार करुनही अदयाप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मागणीनुसार दुकानाची तपासणी करण्यात आली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार दुकानाचा परवाना रद्द करण्याबाबत व दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-०१-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही. तथापि, प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बुलडाणा यांनी चौकशी केली असता तक्रारीत प्राप्त बाटलीतील मद्य संबंधित सीएल-१ घटकाकडे उत्पादित झाले नसल्याचे तसेच सदर बाटलीचे बुच देखील त्या घटकाकडील नसल्याचे आढळून आले. सदर प्रकरणी अनुज्ञप्तीधारक वा इतर कोणीही दोषी नसल्याचे आढळून आल्याने कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगणा (जि.नागपूर) तालुक्यातील प्रस्तावित अडेगांव-गोठणगांव रस्त्यावर बोर नदीवर पुलाचे बांधकामाबाबत

**(५०) १०११६५ (२९-१२-२०१७). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणा (जि.नागपूर) तालुक्यातील गोठणगांव या १०० % आदिवासी बहुल गावासाठी वाहतुक सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने राज्य शासनाकडे प्रस्तावित अडेगांव-गोठणगांव रस्त्यावर बोर नदीवर पुलाचे बांधकामासाठी रु. ३.०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत लोकप्रतिनिधी, हिंगणा यांनी मा.आदिवासी विकास मंत्री यांना दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मार्च २०१६ मध्ये विस्तृत अंदाजपत्रके तयार करुन तांत्रिक मान्यता देण्यात आली असून अद्याप सदर कामांसाठी शासनाने निधी वितरीत करण्यात आलेला नाही त्यामुळे कामांची निविदा प्रक्रिया विभागाकडून करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामांस निधी वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-०१-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) प्रस्तुत रस्त्याचे काम हे आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील असल्याने धोरणानुसार सदर कामास निधी देता येणार नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.